नियमीत फौजदारी खटला क्र. **४/२०२५**
निशाणी क्र. **१४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुशांत मधुकर नाईक** |
| वय सुमारे | : | ५० वर्षे, व्यवसाय : कंत्राटदार |
| निवासस्थान | : | मु. जुना भाजी मार्केट, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना दि. ०७/०८/२०२४ रोजी घडली. त्या दिवशी माझे मामे सासरे घननिळ घारु प्रधान यांचा अपघात झाला होता. सदरचा अपघात ब्राम्हण आळी येथील राम मंदीराच्या अलीकडे मेडीकल स्टोअर्स समोर झाला होता. ते मेडीकल स्टोअर्समध्ये औषध घेण्यासाठी चालले होते. मागून मोटर सायकलवरुन युवराज आला व त्याने त्यांना धडक दिली. मोटरसायकलचा क्रमांक एम् एच् ०६ ४५४५ असा होता.

०२. मी घरी होतो त्यावेळी माझ्या पत्नीचा मला फोन आला. त्यानंतर मी हॉस्पीटलमध्ये गेलो. माझे मामे सासरे मयत झालेले होते. त्यानंतर मी अपघातासंदर्भात पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. १५** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकेन. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अंकित बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्षात अपघात पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जे काही सांगितले आहे ते ऐकीव माहितीच्या आधारे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला मिळालेल्या माहितीप्रमाणे माझे सासरे रस्ता क्रॉस करताना अपघात झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासऱ्यांना रस्ता क्रॉस करायचा होता. हे म्हणणे खरे आहे की, मला हॉस्पीटलमध्ये अपघाताबाबत पोलीसांकडून माहिती मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीच्या माहितीवरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये खोटा मजकूर सांगितलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०७/०८/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.